## -: प्रेसनोट दिनांक- २६/०७/२०२० :-

**दादाहरी अभिमन्यु बांगर, वय ३१, पोलीस नाईक, ब.नं. १२१२, नेम. करवीर पोलीस ठाणे कोल्हापूर, रा. जुनी पोलीस लाईन नं. ९, रूम नं. ५, पोलीस मुख्यालय, कसबा बावडा रोड, कोल्हापूर व प्रविण लहु पाटील, वय २५, होमगार्ड - सनद नं. १४३०, करवीर पथक, रा. भेंडे गल्ली, कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून ती लाच आरोपी नं. २ यांनी स्विकारलेबाबत.........**

यातील तक्रारदार हे सी पी आर हॉस्पीटल, कोल्हापूर येथे वॉर्डबॉय म्हणुन नोकरीस असुन त्यांचे एका मित्राने ऑगस्ट २०१९ मध्ये त्यांना नोकरी लावतो असे सांगुन त्यांचेकडुन २,५१,०००/- रुपये घेतले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०१९ मध्ये त्या मित्राने तक्रारदार यांचे नावावर पल्सर मोटर सायकल विकत घेतली असुन मोटर सायकल घेणेसाठी तक्रारदार यांनी बजाज फायनान्स कंपनीचे कर्ज घेतले होते. ती मोटर सायकल तक्रारदार यांचे मित्रच वापरत होते. सुरुवातीचे ४/५ महिने त्या मित्राने कर्जाचे हप्ते भरले, पण त्यानंतर त्याने कर्जाचे हप्ते भरले नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांचेकडे बजाज फायनान्स कंपनीने कर्ज भरणेचा तगादा लावला होता. त्या मित्राने तक्रारदार यांचे नावावर मोटर सायकल घेतली, परंतु तो आता कर्ज फेडत नाही. तसेच त्याने तक्रारदार यांचेकडुन पैसे घेवुन तक्रारदार यांना नोकरी लावली नाही. त्यामुळे तो तक्रारदार यांची फसवणुक करत असलेचे त्यांचे लक्षात आलेने तक्रारदार यांनी महाराष्ट्र शासनाचे आपले सरकार या पोर्टलवर तक्रारी अर्ज केला होता.

तक्रारदार यांनी केलेला तक्रारी अर्ज चौकशीसाठी करवीर पोलीस ठाणेस आला होता. त्या अर्जाची चौकशी करवीर पोलीस ठाणेचे पोलीस दादा बांगर हे करीत होते. पोलीस दादा बांगर यांनी तक्रारदार यांचे तक्रारी अर्जाची चौकशी करुन तक्रारदार यांना त्यांचे संबंधित मित्राकडुन त्यांची मोटर सायकल परत मिळवुन दिली. त्यावेळी त्यांचे सोबत होमगार्ड प्रविण पाटील रा. कुरूकली हा सुध्दा उपस्थित होता. तक्रारदार यांची मोटर सायकल परत मिळवुन दिली, म्हणुन पोलीस दादा बांगर यांनी तक्रारदार यांचेकडे २००० ते ३०००/- रुपये मागणी करुन तेवढे पैसे होमगार्ड प्रविण पाटील याचेकडे देणेस सांगितले. त्यावेळी होमगार्ड प्रविण पाटील यानेही 'बांगर साहेबांचेमुळे तुला मोटर सायकल परत मिळाली आहे. त्यांनी सांगितलेले पैसे माझेकडे दे', असे तक्रारदार यांना सांगुन लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांचे लाचेच्या मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दि. २५/०७/२०२० रोजी भोगावती साखर कारखान्याचे विश्रामगृह येथे पोलीस नाईक दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये पोलीस नाईक दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे तक्रारी अर्जाप्रमाणे गणेश कांबळे यांचेकडुन गाडी परत मिळवुन दिलेबद्दल बक्षीस म्हणुन ३,०००/- रू. लाचेची मागणी केली. तसेच ती लाच रक्कम पोलीस दादा बांगर यांनी होमगार्ड प्रविण पाटील यांचेकडे दि. २६/०७/२०२० रोजी देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. २६/०७/२०२० रोजी कुरूकली गावचे गावचे चौकात एस टी स्टॅण्डजवळ सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक होमगार्ड प्रविण पाटील यांने तक्रारदार यांचेकडुन त्यांचे तक्रारी अर्जाप्रमाणे गणेश कांबळे यांचेकडुन गाडी परत मिळवुन दिलेबद्दल बक्षीस म्हणुन मागणी केलेली लाच रक्कम ३,०००/- रू. स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. आदिनाथ बुधवंत व पथकाने आरोपी लोकसेवक पोलीस नाईक, ब.नं. १२१२ दादाहरी बांगर यांना त्यांचे राहते घरातुन ताब्यात घेतले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून दादाहरी अभिमन्यु बांगर, वय ३१, पोलीस नाईक, ब.नं. १२१२, नेम. करवीर पोलीस ठाणे कोल्हापूर, रा. जुनी पोलीस लाईन नं. ९, रूम नं. ५, पोलीस मुख्यालय, कसबा बावडा रोड, कोल्हापूर व प्रविण लहु पाटील, वय २५, होमगार्ड - सनद नं. १४३०, करवीर पथक, रा. भेंडे गल्ली, कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द करवीर पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. युवराज सरनोबत, पोहेकॉ मनोज खोत, पोना शरद पोरे व नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, चालक पोहेकॉ विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**